॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

Phone: (02462) 215294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in

email : directorboee@srtmun.ac.in


संदर्भ : समन्वय/२०२२-२३/१०६५ दिनांक : १५/०९/२०२२

# महत्वाचे परिपत्रक

**प्रति,**
**मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**मा.संचालक, सर्व संकुले-विद्यापीठ परिसर,**
**मा.संचालक, उपकेंद्र-लातूर, परभणी,**
**मा.प्राचार्य, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली,**
**मा.समन्वयक, कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास आणि संशोधन केंद्र, किनवट,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : उन्हाळी २०२२ मध्ये झालेल्या परीक्षेसंदर्भात गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाचे आवेदनपत्र सादर करण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना.**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रान्वये उन्हाळी-२०२२ परीक्षेतील कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमातील खालील प्रमाणे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

1) M.A.(all), BA(MCJ), BA(Fashion Design, BA(Lalit), BA(R.M.), B.Voc(F.T.), M.S.W., BA(Animation), B.Voc. (Animation), BA(Interdiciplinary).
2) M.Com.(All), M.Com(B.I.), BBA(ABM),MBA(Affiliated),
3) B.Sc.(Software Engineering), B.Sc.(Bio.Chem.), B.Sc.(H.S.), B.Sc.(Food Sci.), B.Sc.(Biotech.), B.Sc.(Bioinformatics), B.Sc.(Information Tech.), B.Voc. (FPPS), B.Voc. (W.P.T.), B.Voc.(S.D.), M.Sc.(affiliated and Campus), M.Sc.(Soft. Engg.), M.Sc.(CM), M.Sc.(SAN), MCA and Ph.D. Course Work(All)

वरील अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाचे आवेदनपत्र सादर करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

२) विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेच्या पेपरची गुणपडताळणी, सरळ पुनर्मूल्यांकन (Direct Revaluation), उत्तरपुस्तिकेची छायाप्रत व छायांकित प्रती नंतरचे पुनर्मूल्यांकन करता येईल.

अ) १) गुण पडताळणी (व्हेरीफीकेशन) रू. ७५/- प्रती पेपर.
२) उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत रू. ३५०/- प्रती पेपर.
३) छायांकित प्रती नंतरचे पुनर्मूल्यांकन रु. १५०/- प्रती पेपर.
४) थेट पुनर्मूल्यांकन रु. ३५०/- प्रती पेपर.
५) जास्तीत जास्त दोन उत्तरपुस्तिकेच्या छायांकित प्रती घेता येतील.

ब) विद्यार्थ्यांनी महाविद्यालय/विद्यापीठ संकुलामध्ये गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत सरळ पुनर्मूल्यांकनांचे आवेदनपत्र सादर करण्याचा **दिनांक २३/०९/२०२२** असून, या तारखेनंतर कुठल्याही परिस्थितीत आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत.

क) महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्काचा धनाकर्ष काढण्याचा **दिनांक : २६/०९/२०२२**

ड) महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी धनाकर्ष विद्याशाखानिहाय काढावा व आवेदनपत्र विद्यापीठात सादर करण्याचा **दिनांक :२७/०९/२०२२.**

इ) प्रति सत्र (Semester) जास्तीत जास्त दोन विषयांच्या उत्तरपुस्तिकांचे पुर्नमूल्यांकन करता येईल.

ई) महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांकडून प्राप्त झालेल्या उत्तरपुस्तिकेच्या छायांकित प्रती संबंधित विद्यार्थ्यांना त्वरित वितरीत करून सदर छायांकित प्रती प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांत इच्छुक विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे अर्ज विहीत शुल्कासह (रू. १५०/-प्रती विषय) स्वीकारून विद्यापीठात सादर करावेत.

फ) विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत घेऊन पुनर्मूल्याकंन किंवा थेट पुनर्मूल्यांमकन यापैकी एकच सुविधा घेता येईल. यासाठी महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी अर्ज तपासूनच सादर करावेत.

०३. महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी पुनर्मूल्यांकन शुल्काचा धनाकर्ष ''वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड'' यांच्या नावे काढावा.

०४. वरील आवेदनपत्रे महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी केवळ खास दुतामार्फतच परीक्षा विभागाकडे सादर करावीत. पोस्टाने किंवा अन्य मार्गाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

०५. वरीलप्रमाणे मुदत संपल्यानंतर महाविद्यालय/विद्यापीठ संकुलानी कोणत्याही विद्यार्थ्याचे अर्ज परीक्षा विभागाकडे अग्रेषित करू नयेत, अशी आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

०६. महाविद्यालय/विद्यापीठ संकुलांनी सर्व विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे आवेदनपत्र एकत्रितपणे परीक्षा विभागाकडे सादर करावीत. कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा विभागात पाठवू नये.

**टीप - १)** पदवी अभ्यासक्रमांतील ज्या विद्यार्थ्यांचे निकाल Office Verification / "R" मुळे राखीव ठेवण्यात आलेले होते अशाही विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे अर्ज उपरोक्तप्रमाणे महाविद्यालय/संकुलांनी स्वीकारावेत व ती परीक्षा विभागाकडे पाठवावीत. दरम्यानच्या कालावधीत परीक्षा आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखा जाहीर झालेल्या असतील, तर विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाचा निकाल लागण्याची वाट न पाहता परीक्षा आवेदनपत्रे भरावीत.

सबब, वरीलप्रमाणे सर्व नियमांची /सूचनांची तंतोतंत कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**टिप: संबंधित यादी त्या त्या विभागाच्या इमेलवर excel file मध्ये पाठवावी.**

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:** सर्व अधिक्षक/सहा.अधिक्षक, परीक्षा विभाग, सदर परिपत्रकाची काटेकोरपणे व तात्काळ अमलबजावणी करण्यात यावी.